महाराष्ट्र शासन

कृषि विभाग

# कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा)

# यशोगाथा

## सेंद्रिय शेती

शेतक-याचे नांव - श्री. विठ्ठल पंढरी हटवार

रा. पो. - आजनगांव, ता. - वरोरा, जि. - चंद्रपूर



-: कार्यालय :-

तालुका कृषि अधिकारी

वरोरा

# यशोगाथा

## परंपरागत कृषि विकास योजना (सेंद्रिय शेती)



श्री. विठ्ठल पंढरी हटवार

रा. आजनगांव, पो. नागरी,

ता. वरोरा, जि.चंद्रपूर

दुरध्वनी क्र. - ८९७५६७६२९०

श्री. विठ्ठल पंढरी हटवार हे ३९ वर्षीय युवा शेतकरी वरोरा तालुक्यातील आजनगांव या गावचे रहीवाशी आहेत. शेती हा वडीलोपार्जीत व्यवसाय, वडीलोपार्जीत व खरेदी केलेली अशी एकंदरीत कुटुंबाची १०.४९ हेक्टर शेती. आई, वडील, भाऊ व स्वतः असे एकत्रित (संयुक्त) कुटुंब पध्दतीत ते राहतात. यांचे हे कुटुंब संपूर्ण पणे शेतीवर अवलंबुन. व शेती मध्ये त्यांना सुध्दा आवड होती. सध्या नैसर्गिक संकटांमुळे शेती व्यवसाय आतबट्ट्याचा व्यवसाय ठरु पाहत आहे. नैसर्गिक संकटांमुळे शेती करण जिकरीचे ठरत असतांना श्री. विठ्ठल हटवार यांना देखिल प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जावे लागले.

श्री. विठ्ठल हटवार हे पुर्वी प्रमाणेच शेती करत होते. त्यामुळे शेतीला जास्त खर्च व कष्ट करावे लागत असे. खरीप हंगामात कापूस, सोयाबीन, तुर व रब्बी हंगामात हरभरा या मुख्य पिकाची ते लागवड करीत असे. त्यातही



कापूस पिकाचे क्षेत्र सर्वात जास्त व कापसावर त्यांचा जास्त भर असायचा. कपाशीसाठी त्यांना जास्त रासायनिक खत व महागडी औषधांचा वापर ते करीत असे. त्यामुळे इतरांपेक्षा थोडे फार उत्पादन अधिक मिळायचे पण खर्च देखील जास्त लागायचा व खत औषधी विषयी अधिक माहिती नसल्यामुळे व कृषि विभागाच्या संपर्कात देखिल ते कधी येत नसल्याने कृषि निविष्ठा विक्रेत्यांनी सांगितल्याप्रमाणे महागडी खते, औषधे, टॉनिक, वरखते असे अनेक प्रयोग त्यांनी शेतीत केले. दिवसेंदिवस खर्च वाढत चालला व उत्पन्नात घट होत गेली, निव्वळ नफा हाफारच कमी उरायचा व हातात पैसे देखिल की पडू लागले. कुटुंबातील समस्या दिवसेंदिवस वाढु लागल्या व शेती करणे सोडावे असा विचार करण्यास ते भाग पडले.

सन २०१६-१७ च्या माहे एप्रिल मध्ये ग्राम उदय से भारत उदय अभियानांतर्गत गावागावांमध्ये आयोजित ग्राम किसान सभेमध्ये उपस्थित शेतक-यांना कृषि आधारीत विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. त्यातच राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान अंतर्गत परंपरागत कृषी विकास योजना (सेंद्रीय शेती) अंतर्गत सेंद्रीय शेती करण्यास इच्छुक



शेतक-यांचा ५० एकर क्षेत्राचा गट तयार करण्याचे दृष्टीने उपस्थितांना योजनेची उद्दीष्ट्ये, वैशिष्ट्ये व अंमलबजावणी पध्दत याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. श्री. विठ्ठल हटवार यांना देखिल या योजनेची माहिती मिळाली. माहिती ऐकूण त्यांच्या चेह-यावर वेगळे समाधान जाणवू लागले. त्यांनी गावामध्ये सदर योजनेचा लाभ घेण्याचे ठरविले . गावातील शेतक-यांना एकत्र करण्यास सहकार्य केले. सदर योजनेच्या माध्यमातून वरोरा तालुक्यात २४ शेतक-यांचा बळीराजा सेंद्रिय शेती गट तयार करण्यात आला. इतर शेतक-यांपेक्षा श्री. विठ्ठल हटवार यांना सेंद्रिय शेतीमध्ये जास्त आवड असल्याने त्यांना गट मार्गदर्शक म्हणून सर्वानुमते ठरविण्यात आले. व त्यांच्या मार्गदर्शनात गटाची वाटचाल सुरु झाली.



दिनांक १७ सप्टेंबर २०१६ रोजी कृषि मित्र मार्गदर्शन संस्था, घाटंजी व तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, वरोरा यांचे कडून संपूर्ण गटास देण्यात आले. त्या मध्ये दशपर्णी अर्क तयार करणे, जिवामृत, बिजामृत, पंचगव्य, लमित अर्क, सीपीपी युनिट उभारणी, बीडी कम्पोस्ट डेपो लावणे इत्यादी बाबत सविस्तर प्रात्यक्षिकांव्दारे प्रशिक्षण तसेच त्याचा वापर याबाबत माहिती श्री. विठ्ठल हटवार यांनी मिळविली. व गटात त्यांनी आपले २ एकर क्षेत्र घेतले व उर्वरीत सर्व शेतीत ते त्याप्रमाणे अनुकरण करु लागले. पूढे त्याच्याच आधारे त्यांनी स्वतःकडे गांडूळखत युनिट, दशपर्णी, जिवामृत, बिजामृत युनिट, बीडी कम्पोस्ट डेपो व सीपीपी युनिट उभारणी करुन सेंद्रिय निविष्ठा निर्मितीस सुरुवात केली व शेतात सेंद्रिय खताचा तसेच निंबोळी अर्क व निबोळी पेंडचा देखिल वापर वाढविला.




श्री. विठ्ठल हटवार यांनी आपल्या शेतीत खरीप हंगामामध्ये तुर, सोयाबीन, कापुस, भाजिपला व हळद व रब्बी हंगामात हरभरा, गहु, जवस, भाजिपाला करण्यास सुरुवात केली. संपुर्ण शेतात ते सेंद्रिय निविष्ठांचा वापर करु लागले. कृषि विभाग आत्मा अंतर्गत सेंद्रिय शेती योजनेचा लाभ घेवून त्यांनी त्यामध्ये त्यांना पिकास आवश्यक सर्व निविष्ठा घरच्या घरी तयार होऊ लागल्या. निविष्ठा वरील खर्चा कमालीची बचत त्यंनी केली. रासायनिक खताचा पूर्णता खर्च कमी झाला.

हळद पिकापासून वर्षाच्या शेवटी उत्पन्न मिळत असल्याने त्या सोबतच सोयाबीन, भाजिपाला, ढेमसे, मुग, उडीद, हरभरा, गहू, जवस या सारख्या पिकांची सुध्दा लागवड केली. यालाच जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय सुरु केला.



वरील सर्व पिके संद्रिय पध्दतीने घेण्याचे दृष्टीने किड रोग नियंत्रणासाठी दशपर्णी अर्क, लमित अर्क,



जिवामृत, बिजामृत, निंबोळी तेल, अर्क या सारख्या निविष्ठांचा वापर वाढविला. त्यातुन खत व औषधावरील खर्चात बचत झाली. उत्तम प्रतिचा शेतमाल विक्री करिता उपलब्ध होण्यास सुरुवात झाली. सेंद्रिय पध्दतीचा अवलंब केल्यामुळे खर्चात बचत होवून चांतला आर्थिक नफा मिळण्यास सुरुवात झाली.

## मागील वर्षात मिळालेल्या उत्पन्नाचा तपशिल

| अ.क्र. | पिक | उत्पादन (क्वि.) | उत्पन्न (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | भात | ६ | २४००० |
| २ | गहू | २२ | ४४००० |
| ३ | हरभरा | ७ | २८००० |
| ४ | जवस | ३ | १२००० |
| ५ | तुर | १५ | ७५००० |
| ६ | सोयाबीन | २० | १२०००० |
| ७ | हळद | १५ | ९०००० |
| ८ | भाजिपला | २० | १०००० |
| ९ | दुध | १००० लिटर | ५०००० |
| १० | कापूस | ९५ | ४५६००० |
| ११ | मनी दालमिल, आटा चक्की, मिरची व मसाला कांडप, लोणेचे, हळद पावडर, तसेच गांडूळखत व कल्चर विक्री | - | ११५००० |
| | **एकूण** | **-** | **१०२४०००** |



पिकाची सेंद्रिय पध्दतीने लागवड करित असल्यामुळे उत्तम प्रतिचे उत्पादन मिळाले. बाजार भाव टिकवून ठेवण्यात यश मिळाले व आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले. शेतीला पुरक उद्योग म्हणून दुग्धव्यवसाय व गांडूळखत विक्री मधून सुध्दा उत्पन्न मिळत आहे. शेतीत स्वतः विकसित - बॅटरी चलीत स्प्रेपंप बॅटरीच्या सहाय्याने तुर पिकाची शेंडे खुडणी करिता ब्रशकटरची निर्मिती करुन मजूरी खर्चात फार मोठी बचत केलेली पाहावयास मिळते. तसेच NRC 37 या सोयाबीन वाणाचे बिजोत्पादन करुन परिसरातील शेतक-यांना प्रती किलो रु.६० या प्रमाणे सोयाबीन बियाणाची विक्री करुन सुध्दा त्यांनी नफा तर मिळविलाच परंतु परिसरातील शेतक-यांना स्वतःचे बियाणे कसे तयार करायचे हे देखिल पटवून दिले.





उपलब्ध सिंचन सुविधांचा पुरेपूर वापर करुन खरीप हंगामामध्ये तुर, सोयाबीन, कापुस, भाजिपला व हळद व रब्बी हंगामात हरभरा, गहु, जवस, भाजिपाला इत्यादी पिके घेतले जाते. वरील सर्व पिके सेंद्रिय पध्दतीचा अवलंब करुन घेतल्यामुळे शेतमालास चांगली मागणी व दर सुध्दा मिळत आहे. कृषी विभागातर्फे आयोजित सेंद्रिय शेतमाल विक्री मेळावा, कृषी मेळावे, प्रदर्शनीमध्ये सहभागी होवून शेतमालाची ग्राहकांना थेट विक्री करुन चांगला नफा मिळवयास त्यांना मदत झाली. कृषी विद्यापिठ व शासनाच्या कृषी विभागातर्फे आयोजित कृषी मेळावे, प्रशिक्षणास हजर राहून तसेच इतर प्रगतशिल शेतक-यांकडून शेतीतील अद्ययावत तंत्रज्ञान आत्मसात करुन शेती मधून जास्तीत जास्त आर्थिक नफा मिळविण्यावर भर असतो.







इतर शेतक-यांनी सुध्दा सेंद्रिय पध्दतीचा स्विकार करावा व खर्चात बचत करुन शाश्वत उत्पन्न मिळवावे, हीच अपेक्षा !